॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
North Maharashtra University, Jalgaon
P. B. No.80, Umavinagar, Jalgaon - 425 001 (M.S.)
"A" Grade
NAAC Reaccredited
3rd Cycle

# मतदारांसाठी महत्वाच्या सूचना

१) विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या निवडणुकीसाठी पसंतीक्रमानुसार (प्रेफरेन्सिअल व्होटींग) मतदान पध्दत आहे.

२) मतपत्रिका मतदान पेटीत टाकण्यापूर्वी - (१) मतपत्रिकेची उभी घडी करावी. (२) उभ्या घडीच्या मधोमध आडवी घडी करावी आणि नंतरच ती मतपत्रिका मतपेटीत टाकावी.

३) मतपत्रिका स्वीकारण्यापूर्वी मतदाराने आपल्या नावासमोर मतदार यादीमध्ये स्वाक्षरी करणे आवश्यक आहे व मतपत्रिका व्यवस्थित आहे याची खात्री करुन घ्यावी. मतपत्रिका सदोष असल्यास ती मतपत्रिका केंद्राध्यक्षांकडून बदलवून घ्यावी.

## ४) <u>मतदान पध्दतीसंबंधीचे नियम :</u>

(१) प्रत्येक मतदारास एक हस्तांतरणीय मत असेल.

(२) मतदार त्याचे मत नोंदवतांना :

क) पसंतीक्रम या स्तंभात ज्या उमेदवाराला मतदान करील त्या उमेदवाराच्या नावासमोर त्याच्या मतपत्रिकेवर अंक '१' नमूद करील;

ख) याशिवाय, त्याला जेवढ्या अन्य उमेदवारांना मत द्यायचे असेल त्यांच्या संबंधित नावासमोर त्याची निवड किंवा पसंतीक्रम अंक '२', '३', '४' असे सलग अंक नमूद करुन दर्शवेल;

ग) एक मतपत्रिकेवर दोन भाषेत पंसतीक्रम नमूद करु नयेत.

घ) पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करणार नाही.

ड) मतदान केंद्रावर मतपत्रिकेवर पसंती क्रमांक नोंदविण्यासाठी जो पेन पुरविला जाईल, त्याच पेनने पसंती क्रम नोंदवायचा आहे.

च) मतपत्रिकेवर पसंती क्रमांक '१' नोंदविणे आवश्यक आहे.

छ) मतदानासाठी देण्यांत येणा-या सर्व मतपत्रिकांवर मतदारांनी त्यांच्या पसंतीनुसार क्रमांकाची नोंद अंकी (जसे - 1,2 किंवा १,२) स्वरुपात करावी. पसंतीदर्शक आकडे अंकातच इंग्रजी किंवा मराठी या पैकी कोणत्याही एका भाषेत परंतु एकाच पध्दतीने लिहिणे आवश्यक आहे. पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करु नये. मतदाराने आपल्या पसंतीचे प्रथम क्रमांकाचे मत हे मतपत्रिकेवर नोंदवलेच पाहिजे. तसे न केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

५) मतपत्रिका खालील परिस्थितीत अग्राह्य ठरविली जाते :

क) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' दर्शवण्यात आला नसेल,

किंवा

ख) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर दर्शवण्यात आला असेल,

किंवा

ग) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक '१' व काही अन्य अंक एकाच उमेदवारांच्या नावासमोर दर्शवण्यात आले असतील;

किंवा

घ) प्रथम पसंतीक्रम किंवा त्यापुढील पसंतीक्रम, शब्दात किंवा रोमन अंकात किंवा इंग्रजी किंवा मराठी भाषा वगळून कोणत्याही अन्य भाषेच्या अंकात दर्शविण्यात आले असतील;

किंवा

ड) प्रथम पसंतीक्रम नोंदवण्यात आलेला उमेदवार निर्धारित करता येत नसेल;

किंवा

च) मतदाराने निवडणूकीमध्ये मतपत्रिकेवर जे नंतर ओळखता येईल असे कोणतेही चिन्ह नमूद केले असेल;

किंवा

छ) निळ्या शाईखेरीज अन्य कोणत्याही शाईने पसंती दर्शविली असेल.

किंवा

ज) मतदाराची पसंती दर्शविणा-या अंकांमध्ये कोणतीही खाडाखोड, गिरवागिरव किंवा फेरफार केला असेल,

किंवा

झ) मतदारांनी मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविल्यावर सदर मतपत्रिका इतरांना दाखविल्यास मतपत्रिका बाद केली जाईल.

ट) मतपत्रिकेवर फुलीची (✖) किंवा बरोबरची (✓) खूण करुन मत नोंदविलेले असल्यास.

ठ) पसंती क्रमांक योग्य त्या दिलेल्या जागेवर नमूद केले नसल्यास.

ड) पसंतीचे क्रमांक एकाच अंकात नसल्यास (उदा. पसंतीचे क्रमांक अनुक्रमाने नोंद करतांना १, २, ३, ४ ऐवजी ०१, ०२, ०३, ०४ असे क्रमांक नोंद केल्यास मतपत्रिका अवैध होते).

६) एकापेक्षा अधिक उमेदवारांना देण्यात आलेला पुढील पसंतीक्रम असलेली वैध मतपत्रिका अशा लगतनंतरच्या पसंतीक्रमासाठी अवैध ठरेल.

७) फेर मतमोजणी :

विद्यापीठ निवडणुकीतील मतदान हे पसंती क्रमानुसार होत असल्याने फेर मतमोजणीची प्रक्रीया यात नाही. उमेदवारांना काही शंका असल्यास त्या-त्या फेरीमध्येच त्यांनी शंका विचारणे व त्याचे निरसन करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त सूचनांचे पालन करावे व मतदारांनी शांततेने मतदान करुन विद्यापीठ निवडणूक प्रक्रियेस सहकार्य करावे.

3-5-18

निवडणूक निर्णय अधिकारी,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**INSTRUCTION AND LIST 2018.doc**